## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागपूर

## जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत आरोग्य विभागातील गट क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात पदभरती सन २०२१ जाहिरात क्रमांक:०१/२०२१

### शुध्दीपत्रक

ग्राम विकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. सकीर्ण २०२०/प्र.क्र ९९/आस्था ८ दिनांक १ सप्टेबर २०२१ व शासन पत्र क्र-संकीर्ण२०२०/ प्र.क्र ९९/आस्था ८ दिनांक २ सप्टेबर २०२१ अन्वये शासन निर्णय दिनांक १४.६.२०२१ मधील परिच्छेद क्र १(६)मधील नमुद बाब व शासन शुध्दीपत्रक क्र सकीर्ण २०२०/प्र.क्र ९९/आस्था ८ दिनांक २०.८.२०२१ चे विवरण पत्र अ मधील मुददा क्र ५ (दिनांक २६.८.२०२१ रोजी जाहीराती सोबत प्रसिध्द केलेल्या जाहीर प्रकटणातील मुददा क्र ५) ऐवजी खालील मुद्दे जाहीर प्रकटणात व जाहीरातीमध्ये अंतर्भूत करण्यात येत आहे.

माहे मार्च २०१९ च्या जाहीरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमधील एक किंवा अधिक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रदद झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती ही OMR Vender मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहुन परिक्षा देता येणार आहे. तथापि ५ संवर्गाच्या पदभरती संदर्भात घेण्यात येणा-या परिक्षेसाठीच्या प्रत्येक संवर्गाची प्रश्नपत्रिका सर्व जिल्हा परिषदांसाठी संवर्गनिहाय सामायिक राहणार आहे. त्यामुळे सन २०१९ च्या जाहितीनुसार ज्या उमेदवाराने एक किंवा एकापेक्षा अधिक संवर्गाच्या परिक्षेसाठी एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदेमधून अर्ज भरलेले आहेत. त्या उमेदवारांचे सर्व ठिकाणी भरलेले अर्ज ग्राहय धरले जातील.अशा उमेदवारांबाबत त्याने प्रत्यक्ष एकाच जिल्हा परिषदे अंतर्गत आयोजित परिक्षेस उपस्थित राहुन परिक्षा दिल्यानंतर सदर परिक्षेमध्ये त्याला प्राप्त होणा-या गुणांच्या आधारे त्याने ज्या ज्या जिल्हा परिषदेतून सदर पदभरतीसाठी अर्ज भरला आहे. त्या त्या जिल्हा परिषदांच्या सदर पदांकरिता तयार होणा-या गुणवत्ता (प्रवर्गनिहाय) यादीमध्ये त्याचे नांव गुणवत्ता क्रमांकानुसार अंतर्भूत केले जाईल.

तसेच , नव्याने समाविष्ट झालेले दिव्यांग प्रवर्ग व खुल्या प्रवर्गात नव्याने वाढ झालेल्या रिक्त जागांसाठी प्रसिध्द होणा-या जाहितीनुसार परिक्षेला बसु इच्छिणा-या उमेदवाराला ग्राम विकास विभागाच्या दि २३.७.२०१८ च्या शासन निर्णयानुार एक किंवा एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदांमध्ये पदांसाठी अर्ज करता येईल. तसेच एका उमेदवाराला एका किंवा अनेक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा राहिल. परंतु, प्रत्येक पदासाठी त्याला स्वतंत्र परिक्षा शुल्क आकारले जाईल.तसेच, उमेदवाराने परिक्षेसाठी उपस्थित राहण्याकरिता जिल्हा परिषदेचा विकल्प देणे आवश्यक आहे.याबाबत, www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उमेदवारास प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. तसेच, सदर उमेदवारांबाबतही परिक्षा व गुणवत्ता यादीबाबतची कार्यपध्दती वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे राहिल.

**दिनांक २६.८.२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहीर प्रकटणातील मुददा क्र ८ रदद करण्यात येत आहे व सविस्तर जाहीरातीमधील अर्ज करण्याची पध्दत मधील अनु क्र ३ मधुन "एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांकडुन जिल्हाच्या विकल्प घेणे" ही बाब वगळण्यात येत आहे.**

ठिकाण :- नागपूर
दिनांक :- ०६ /०९/२०२१

( योगेश कुंभेजकर,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नागपूर